REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# कुर्डूवाडी-माढा कृषि उत्पन्न बाजार समितीचा ऐतिहासिक अभ्यास



**प्रा.डॉ. भारत जाधव**
**सहयोगी प्राध्यापक,देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ.**

## प्रस्तावना :

कृषि उत्पन्न बाजार समिती ची स्थापना १३ एप्रिल १९५० रोजी झाली. सोलापूर जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी गणपतराव साठे कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य प्रवर्तक होते. या कामी त्यांना मोडनिंबचे महाडिक वकील, जामगावकर पाटील, निमगांवचे विठ्ठलराव शिंदे, बी. जी. गायकवाड, प्रभाकर साठे मोडनिंब यांचे बहुमोल सहकार्य लाभले. संस्थापक चेअरमन म्हणून गणपतराव साठे यांनी काम पाहिले. इ. स. १९५३ ते इ. स. १९६१, आणि इ. स. १९६५-६६ या कालावधीमध्ये ते कुर्डूवाडी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती होते.

## ➢ बाजार आवार व कार्यक्षेत्र :

कृषि उत्पन्न बाजार समितीच्या स्वतःच्या मालकीची कुर्डूवाडी येथे ९ हेक्टर ३२ आर जमीन, मोडनिंब येथे ६ हेक्टर २५ आर, माढा येथे २ हेक्टर ६६ आर जमीन, तर टेंभुर्णी ७ हेक्टर ६९ आर जमीन आहे. कुर्डूवाडी, टेंभुर्णी, माढा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या इमारती आहेत. कुर्डूवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी, माढा वहातुकीच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे. संपूर्ण माढा तालुका या बाजार समितीचे कार्यक्षेत्र असून तालुक्याच्या आसपासच्या प्रदेशातून या ठिकाणी माल विक्रीसाठी येतो. कृषि प्रधान देशातील शेतकरी सुधारला तरच देशाची प्रगती साधता येईल. गरीब-श्रीमंत शेतकऱ्यांच्या प्रगतीकडे लक्ष देवून त्यांची आर्थिक भरभराट झाली पाहीजे. हा दृष्टीकोण समोर ठेवून शेतीमालाला योग्य आणि किफायतशिर भाव मिळवून देणे, शेतीउत्पादित माल बाजारपेठेपर्यंत पोहचविण्यासाठी मदत करणे, शेतकऱ्यांची दलालापासून सुटका करणे, शेतीमालाच्या तारणावर शेतकऱ्यांना आगाऊ पैसे देणे या उद्देशाने कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडीची स्थापना करण्यात आली.[१]

## ➢ शेतीमालाची विक्रीपध्दती :

कृषि उत्पन्न बाजार समितीने कुर्डूवाडी येथील (जुना बाजार) आठवडा बाजार आवारात तीन पत्र्याची मोठी निवारा शेड उभारली आहेत. दररोज सकाळी कुर्डूवाडीच्या आसपास असणाऱ्या खेड्यातील बहुसंख्य शेतकरी आपला भाजीपाला, कांदा, कडधान्ये, तृणधान्य, फळे, व इतर वस्तू घेवून येतात. लिलाव पध्दतीने त्याची बोली बोलली जाते. या ठिकाणी भाजीपाला ठोक व्यापारी, दलाल, किरकोळ भाजीपाला विक्रेते, फेरिवाले, महिला बचत गटामार्फत भाजीपाला व्यापार करणाऱ्या महिला माल घेण्यासाठी हजर राहतात. जो ज्यादा बोली बोलेल त्याला तो माल देण्याची पध्दत आहे. शंभर रुपयापेक्षा ज्यादा असेल तर शेकडा १% रुपया प्रमाणे कमिशन दिले जाते. जर मालाची किंवा भाजीपाल्याची किंमत शंभर रुपयांपेक्षा कमी असेल तर त्याला सरासरी १० रुपये दिले जातात. माल जर फारच कमी किमतीला विकला असेल तर भाजीपाल्याच्या पेंडया

दिल्या जातात. विकलेल्या मालाची बोली बोलणाऱ्या व्यक्तीमार्फत मालाची किंमत संबंधित शेतकऱ्याला रोख स्वरुपात दिली जाते. सदर लिलावासाठी कोणताही कर आकरला जात नाही.

यामध्ये जाहीर लिलावाने शेतीमालाची विक्री व त्याच दिवशी वजन, माप त्वरीत विक्री मोबदला देण्यात येतो. शेतकऱ्यांना तत्पर सेवा, शेतकरी, व्यापारी व इतर बाजार घटकांचा योग्य समन्वय ठेवला जातो. सुट, सांड, कडता, कापण्यास बंदी असून वांद्याचा त्वरीत निर्णय दिला जातो. कांदा या शेतीमालाची आवक झाले बरोबर वजन केले जाते. शॉपिंग सेंटर गाळे कुर्डूवाडी ६०, मोडनिंब ५०, टेंभुर्णी २१०, माढा ४० या पासूनचे दरसाल १७ लाखचे उत्पन्न मिळते. फळे व भाजीपाल्याचे विक्रीसाठी मोडनिंब व कुर्डूवाडी येथे भव्य सेलहॉल, शेतकऱ्यांसाठी फळे व भाजीपाला विक्रीकरीता ९० गाळे विनामूल्य उपलब्ध करुन दिले आहेत. अशी वैशिष्ट्ये पहावयास मिळतात.

कृषि उत्पन्न बाजार समितीने सुरुवातीच्या काळात बाजार आवारामध्ये शेतीमालाचे नियमन करण्यासाठी बाजार समितीने शासनाकडून कृषि उत्पन्न व इतर वस्तू असे एकूण ६० परवाने घेतले होते. त्यानुसार बाजार समिती अवारात असलेल्या जागेमध्ये आडत व्यापार व व्यापारासाठी परवाने देण्यात आले. अ वर्ग व्यापारी, ब वर्ग व्यापारी, किराणा व्यापारी, किरकोळ विक्री दुकानदार, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानदार, शेतीमालावरती प्रक्रिया करणारे व्यापारी, यांना आपला व्यवसाय, व्यापार, दुकान, विक्री व्यवसायासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत आपल्या परवाण्याचे नूतनीकरण करावे लागते. यासाठी आडत व्यापारी तसेच अ वर्ग व्यापारी यांना नूतनीकरण फी म्हणून २०० रुपये आकार भरावा लागे. ब वर्ग दुकानदार व्यापारी व इतर व्यापारी यांना प्रत्येकी ४० रुपये फी भरावी लागे. स्वस्त धान्य दुकानदारांना १०० रुपये फी भरावी लागे.

कुर्डूवाडी कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत ज्या ठिकाणी जनावरांचे बाजार भरविले जातात त्या ठिकाणी बाजारामध्ये विविध जातीची जनावरे विक्रीसाठी येतात. जनावरांना कृषि उत्पन्न बाजार समितीने ठरवून दिलेला नाममात्र कर भरावा लागतो. हा कर शेळ्या-मेढ्यांसाठी २.०० रूपये, गाय-बैल, म्हैस यांच्यासाठी ५ रूपये असा कर भरावा लागतो. याबरोबरच जनावरांच्या खरेदी-विक्रीवरदेखील कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत कर आकारला जातो. तो शेळ्या-मेंढ्यासाठी ७५ पैसे प्रत्येकी, तर गाय-बैल, म्हैस या जनावरांसाठी विक्री झालेल्या रकमेच्या १ % आकारला जातो.[२]

## ➢ शेतमालाची वाहतूक :

शेतकऱ्यांना उत्पादित माल बाजार पेठ, आडत बाजारामध्ये पाठवण्याची मोठी समस्या होती. इ. स. १९९० पूर्वीच्या कालावधीमध्ये खाजगी वहातुकीची साधने उपलब्ध नव्हती, बैलगाडी, घोडागाडी (टांगे), छकडा, गाडीवाले अशा प्राथमिक वहातुकीच्या साधनाचा उपयोग करावा लागत असल्याने अनेक अडचणी येत असत. अशा परिस्थितीत कुर्डूवाडी कृषि उत्पन्न बाजार समिती, माढा, मोडनिंब, टेंभुर्णी या उपबाजार समितीकडे मागणीनुसार वाहनाची सोय उपलब्ध करून दिली जाते. कुर्डूवाडी हे मुंबई-मद्रास (चेन्नई) ब्रॉडगेज रेल्वेमार्गावर आणि मिरज-लातूर नॅरोगेज मार्गावरील महत्वाचे जंक्शन असल्याने रेल्वेने मालाची चढउतार सुलभ झाली. मोडनिंब, टेंभुर्णी उपबाजार समित्या पुणे-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वर असून टेंभुर्णी उपबाजार समिती आवार हे पंढरपूर-अहमदनगर, पुणे-उस्मानाबाद-लातूर राज्यमार्ग तसेच मोडनिंब हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ वर असल्याने वहातुकीच्या दृष्टीने सोईचे आहेत मात्र माढा कृषि उत्पन्न बाजार उप समिती आवार थोडेसे अंतर्गत भागात असले तरी कुर्डूवाडी- वैराग रस्ता, मोहोळ-कुर्डूवाडी रस्त्यावर आहे. काही प्रमाणात माढा उपबाजार समितीला वहातुकीची अडचण आहे. परंतु अलीकडच्या काळात खाजगी वहातूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. कुर्डूवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी, माढा या बाजार आवाराभोवती संरक्षक भिंत, तारेचे कुंपण घेतले असल्याने बाह्यशक्तीचा फारसा त्रास होत नाही.

## बाजार समितीने पुरविलेल्या सोई-सुविधा :

कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडी आणि मोडनिंब, टेंभुर्णी, माढा या उपबाजार आवारामध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी शौचालये, मुताऱ्या व पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत. तसेच त्या टाक्यांची स्वच्छता करण्याची यंत्रणा उभी करून ठेवलेली आहे त्यामुळे बाजार समित्या व उपसमित्यांनी सर्वांच्या आरोग्याची काळजी घेतली आहे. वरील चारही ठिकाणी शेतकरी आपला माल घेवून आला आणि परत जाण्यास काही अडचण आल्यास त्यांना मोफत निवासाची व्यवस्था व्हावी, बाहेरगावाहून जिल्ह्याबाहेरून, राज्याबाहेरून व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या व्यापाऱ्यांची देखील मुक्कामाची अतिशय चांगली व्यवस्था केलेली आहे.

शेतीविषयक ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे यासाठी मोफत वाचनालयाची सोय केलेली आहे. त्यामध्ये शेतकरी मासिक, कृषि धन मासिक, ॲग्रोवन, ॲग्रोव्हिजन, लोकराज्य, शेतकरी राजा, बळीराजा, अर्थविश्व, सहकार विश्व, योजना, अर्थसंवाद अशा प्रकारची अनेक मासिकाबरोबरच संचार, समाचार, विश्वसमाचार, लोकमत, पुढारी व इतर वर्तमानपत्रे मोफत वाचण्यासाठी मिळतील याची व्यवस्था केलेली आहे.

संपूर्ण बाजार आवारात दिवाबत्तीची चोख व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे चोरी, लुटालूट, यापासून व्यापारी किंवा शेतकरी यांचे संरक्षण होते. याशिवाय संरक्षणासाठी द्वारपाल आणि वॉचमनची नेमणूक करण्यात आली आहे. याचप्रमाणे सर्वांच्या सोईसाठी एस. टी. डी, लोकल कॉलच्या व्यवस्थेसाठी कॉलसेन्टरची जागोजागी व्यवस्था करून ठेवली आहे. अशाप्रकारे जास्तीत-जास्त सुख सुविधा पुरवण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

### आर्थिक व्यवहार :

सहकार चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोहचवण्याचे काम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात इ. स. १९६० नंतर सुरू झाले. शहरीभागाच्या बरोबर ग्रामीण भागाचा कायापालट झाला पाहिजे. 'खेड्याकडे चला' या महात्मा गांधीच्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी ग्रामीण भागात अर्थपुरवठा, कर्जपुरवठा, ठेवी, बचती, पिकपाणी व इतर कर्ज व्यवस्था देण्याघेण्याच्या सुविधेसाठी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला अधिकार दिले असल्याने आणि सर्वांना सोईची असल्याने कृषि उत्पन्न बाजार समितीचा सर्व आर्थिक व्यवहार सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सोलापूर शाखा कुर्डूवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी, माढा शाखेमधूनच व्यवहार केले जातात.

कृषि उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी कामकाज अतिशय प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. बाजार समित्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासाच्या व्यवस्थेसाठी बाजार अवारात वसतीस्थाने बांधली आहेत. सहकारी कायद्याप्रमाणे आणि शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना बँकेमार्फत वेतन अदा केले जाते. त्यांचा व्यवसाय कर, ग्रॅच्युएटी बोनस, विमा, सानुग्रह अनुदान, भविष्यनिर्वाह निधी दिला जातो. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांच्या भवितव्याची काळजी बाजार समिती घेत असल्याचे दिसून येते. संचालक मंडळाच्या वर्षातून ९ ते १० सभा (बैठका) होतात. त्याच बरोबर सर्वसाधारण सभा दोनवेळा घेतल्या जातात.

### पर्यावरण संतुलनाचा प्रयत्न :

कुर्डूवाडी कृषि उत्पन्न बाजार समितीने पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रयत्न केले त्यामध्ये वृक्षलागवड केली असून शेतकऱ्यांना आपल्या शेतात तसेच बाजार समितीच्या आवारामध्ये राष्ट्रीय पुरूषांच्या जयंती-पुण्यतिथी कार्यक्रमाचे औचित्य साधून बदाम, नारळ, पिंपळ, वड, अशोक, बोटल ट्री, नारळ, करंजी, निलगिरी, शिसम, जांभूळ, गुलमोहर, आपटा, चिंच, कडुलिंब अशाप्रकारची झाडे लावून ती जगवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर मोडनिंब, टेंभुर्णी, माढा या उपबाजार आवारामध्येदेखील अशाच प्रकारची वृक्ष लागवड केल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या वृक्षलागवडीतून पर्यावरण संतुलन राखण्याचा काही प्रमाणात प्रयत्न केल्याचे दिसते.

### बाजार मालाचे व्यवस्थापन :

कृषि उत्पन्न बाजारामध्ये येणारा माल आडतीवरती चढउतार करण्यासाठी हमालाची व्यवस्था आहे कृषि उत्पन्न बाजार समितीचे गठण झाल्यांनंतर वेगवेगळया कमिट्या नेमल्या जातात त्यामध्ये तक्रार निवारण कमिटी किंवा ' वांदाकमिटी ' महत्वाची आहे. या कमिटीकडे सभासद शेतकऱ्यांच्या तक्रारी किंवा समस्या एकत्र केल्या जातात. या समितीकडे ज्याची तक्रार किंवा समस्या आहे त्यास आपले मत मांडण्याची संधी दिली जाते.

### शेतकरी कार्यशाळेचे आयोजन :

कृषि उत्पन्न बाजार समिती बद्दल शेतकऱ्यांच्या मनात आपुलकी निर्माण झाली पाहिजे यासाठी शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ व कर्मचारी प्रयत्नशील असतात. यामधूनच शेतशाळेचे आयोजन करण्यात येते. या शेतशाळेमधून प्रत्यक्ष खेडयापाडयामध्ये, वाड्यावस्त्यावर जाऊन शेतकऱ्यांना डाळिंब, बोर, कांदा या पिकाबाबतचे प्रशिक्षण देवून त्यांच्या नियोजनाची माहिती दिली जाते. कमी पावसाच्या वेळी कमी पाण्यावर फळबागांचे जास्तीत-जास्त उत्पादन शेतकऱ्यांना मिळेल याचा प्रयत्न या शेतशाळामधून केला जातो.

शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात न केल्यामुळे शेतकरी पारंपारिक पध्दतीने शेती करतो. त्यातच पावसाचा लहरीपणा, दुष्काळ सदृष्य परिस्थिती अशा प्रकारच्या वेगवेगळया कारणामुळे उत्पादन कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यांना पदरी नैराश्य येते. अशा वैफल्यग्रस्त परिस्थितीमुळे शेतकरी आत्महत्येसारखा पर्याय शोधून आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न करतो. ही अवस्था त्याच्या पदरी येवू नये म्हणून नवनवीन बदलते तंत्रज्ञान सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कृषि तज्ञांची प्रगतशिल बागायतदारांचे अनुभव या कार्यशाळेतून सांगितले जातात. प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील मातीचे परिक्षण करुन घेतले पाहिजे. त्यानुसार कोणत्या जमिनीत कोणते पीक घ्यावे, कोणत्या हंगामामध्ये कोणती पिके घ्यावी,

उस लागवड, कापूस लागवड, मिरची अशी नगदी पिकांचे क्षेत्र वाढवण्यासाठी तसेच फळबागा किंवा भूसार स्वरुपाची उत्पादने कशी घ्यावी, पिकांच्या वाढीसाठी कोणती औषधे फवारावीत याचे मार्गदर्शन केले जाते. त्याच बरोबर जास्त पीक देणाऱ्या नवीन संकरित वानाची माहिती दिली जाते.

शेतकरी आपला माल तयार झाल्याबरोबर तसाच आडतीवर किंव बाजारपेठेत विक्रीसाठी नेतो, काही वेळेस तो माल तसाच घरात ठेवून देतो. परंतु त्या मालाची व्यवस्थित निगा न राखल्यामुळे त्या मालाची नासाडी होते. ज्यावेळी बाजारपेठेत मालाची आवक जास्त होते. त्यावेळी भाववाढ होईपर्यंत तो साठवून ठेवावा लागतो. अशावेळी मालाची नासाडी होऊ नये तो खराब न होत टिकून रहाण्यासाठी कोणते उपाय करायचे याचे मार्गदर्शन केले जाते. बोरीवरती पडणारा भूरीरोग, फळे पोखरनारी अळी यासाठी फेनव्हलरेट, डेल्टामेथ्रीन, कार्बारील कसे किती प्रमाणात व केंव्हा फवारावे, डाळींबावरील मररोग, तेल्या रोग यासाठी हेकझॅकोनॅझोल, प्रोपीकोनॅझोल, कार्बेडॅझीम किंवा कार्बेडॅझीम द्रावण कसे फवारावे, केळी, द्राक्षे, सीताफळ, रामफळ, पपई, चिक्कू, पेरु, जांभूळ, चिंच, कागदी लिंबू, टरबूज, कलिंगड यांच्यावर पडणारे रोगाबरोबर त्या फळपिकांचे संकरित वान, खते, पाणी नियोजन याची इतंभूत माहिती राहुरी कृषि विद्यापीठातील तंज्ञांच्याकडून माहिती देण्यात येते.[३]

भाजीपाल्याध्ये टोमॅटो, वांगी, कांदा, भेंडी, कारली, काकडी, शेवगा, कोबी, मुळा, दूधी भोपळा, दोडका, मेथी, पालक, गवार, घेवडा, लसून, रताळी, अळू या संदर्भात  योग्य अशी माहिती दिली जाते. अशा प्रकारच्या वेगवेगळया नगदी पिके, फळबागा, भाजीपाला यासंदर्भात लागणी पासून ते पीक निघेपर्यंत कार्यशाळेत माहिती दिली जाते. मिळालेल्या उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळवून देण्यासाठी  मार्गदर्शन केले जाते. शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय म्हणून दुभत्या जनावराकडे लक्ष द्यावे लागते. या व्यवसायाच्या वाढीसाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून जनावरांची शिबिरे माढा, मोडनिंब, कुर्डूवाडी, टेंभुर्णी अशा ठिकाणी घेतली जातात. यातूनच शेतकऱ्यामध्ये जास्त चांगली जनावरे पाळण्याची स्पर्धा लागते. यातूनच शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साधला जातो.[४]

पाण्याच्या बेसुमार वापरामुळे जमिनी पानथळ, खारवट होतात. पाणी उपलब्ध असल्यास गरजेपेक्षा जादा पाणी देवून पाण्याचा अपव्यय करतात. त्यामुळे पिकाला लागेल तेवढेच पाणी देणे, कमी पाण्यावर जादा पीक कसे घेता येईल यासाठी त्यांना ठिबक सिंचानाचे महत्व पटवून दिले जाते. ठिबक सिंचानामुळे रासायनिक खतांचे प्रमाण कमी होते. द्रवरूपखते दिल्यामुळे ती पिकाच्या नेमक्या मुळाशी मिळतात. त्यामुळे पीक वाढीस फायदा होतो. शासनाचे ठिबक सिंचानासाठी असणारे ३५ % अनुदान शेतकऱ्यांना मिळते. तसेच कुर्डूवाडी बाजार समितीमार्फत कांद्यासारख्या पिकांना पणन मंडळामार्फत अनुदान मिळवून दिले जाते.

कुर्डूवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी, माढा या ठिकाणच्या बाजार आवारामध्ये येणारी वाहने, बैलगाड्या यांच्यामुळे पालापाचोळा पसरतो. या ठिकाणी भरणाऱ्या आठवडा बाजारादिवशी शेन, कचरा, लेंढ्या यांची घान होते. त्याची दुर्गंधी सुटून आसपास राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याला धोका उत्पन्न होऊ नये यासाठी तो दूसऱ्या दिवशी बाजार समितीच्या सेवक यंत्रनेकडून गोळा करून शोष खड्यात गाढला जातो. यापासून कृषि उत्पन्न बाजार समितीस खत विक्रीपासून उत्पन्न मिळते. कूजवलेल्या खताचे लिलाव काढून शेतकऱ्यांना विकले जातात. त्यामुळे कांही प्रमाणात कृषि उत्पन्न समितीला उत्पन्न मिळते.

### गोडावून :

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला माल काही तांत्रिक कारणाने किंवा अडचणीमुळे विकला गेला नाही किंवा बाजार भाव कमी आला तर शेतकरी आपला माल विक्री करत नाही. किंवा काही शेतकऱ्यांना आपल्या मालाचा साठा करून ठेवायचा असेल तर तो माल सुरक्षित राहावा म्हणून कुर्डूवाडी येथे ९,५०० मे. टन क्षमतेची तीन, ५,००० मे. टन क्षमतेची दोन मोडनिंब येथे ५,००० मे. टन क्षमतेचे एक, टेंभुर्णी येथे ५,००० मे. टन क्षमतेचे एक अशी गोडावून बांधली आहेत. या गोडावूनमध्ये ठेवण्यात येणाऱ्या मालाला अगदी नाममात्र भाडे म्हणजे महिन्याला १.२ ते १.५० पैसे आहे. पैसे मिळवणे हा उद्देश नसून शेतकऱ्यांना त्याचा जास्तीत-जास्त फायदा मिळाला पाहिजे हा उद्देश आहे. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आपला माल या गोडावूनमध्ये अतिशय विश्वासाने ठेवताना दिसून येतात.

### दुय्यम बाजार आवार :

कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडीचे दुय्यम बाजार मोडनिंब, टेंभुर्णी, माढा येथे आहेत. सदर बाजारांना स्वतःची जागा आहे. याच जागेमध्ये त्यांचे बाजार भरतात. या ठिकाणी असलेल्या अडती व गाळ्यापासून मिळणारे उत्पन्न बाजार समितीलाच मिळते. मोडनिंब येथे जनावरांचा बाजार दर शनिवारी दुय्यम बाजार आवारात भरतो. मोडनिंब येथील आडतबाजार ही महाराष्ट्रातील निवडक महत्वाच्या बाजारपेठांमध्ये नावाजलेली आहे. या आडत बाजारामध्ये प्रामुख्याने लाल मिरची, कापूस, ज्वारी, बाजरी, मका, गहू, खपली जोड, गूळ, तूर, मूग, हरभरा, सूर्यफूल, भुईमूग शेंग

आणि मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक त्या-त्या हंगामध्ये मोठ्या प्रमाणात होत असते. या आडत बाजार पेठेत गुलबर्गा, धारवाड, हैद्राबाद, मद्रास, सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, उस्मानाबाद, पुणे, नगर, नाशिक अशा विविध भागातून वेगवेगळ्या मालाचे व्यापारी येतात. कांदा मार्केटचे दक्षिण भारतातील व्यापारी दरवर्षी साधारण नाताळाच्या सनापर्यंत येतात. इथून पुढे कांद्याची आवकही कमी होते. सोलापूर जिल्ह्यात साखर कारखानदारी वाढल्याने गुळाचे उत्पादन आणि आवक कमी झाल्याचे दिसून येते. मोडनिंब बाजारासाठी अरण, भेंड, तुळशी, जाधववाडी, शेटफळ, आष्टी, बैरागवाडी, गिड्डेवाडी, देवडी, पापरी, खंडाळी, तेलंगवाडी, वाफळे या गावातील लोक बाजारामध्ये येतात.

टेंभुर्णी उपबाजाराची स्थापना ५ ऑक्टोंबर १९५४ मध्ये करण्यात आली. टेंभुर्णी उपबाजार आवाराचे एकूण क्षेत्र ७ हेक्टर ६९ आर आहे. यामध्ये उपबाजार कार्यालयाची इमारत बांधण्यात आली असून त्यामुळे उपबाजार समितीचे कार्यालय आहेत. या कार्यालयामध्ये ०३ एवढे कर्मचारी आहेत. बाजार समितीमध्ये एवढ्या आडती असून त्यांना भाडे आणि डिपॉझिट तत्वावर देण्यात आल्या आहेत. टेंभुर्णी उपबाजार समितीचे उत्पन्न मुख्य बाजार समिती कुर्डूवाडी येथे जमा करावे लागते. टेंभुर्णी उपबाजार आवारामध्ये लहान मोठे उद्योग चालावे बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १५X२० चे गाळे बांधले असून, त्यामुळे माढा तालुक्यातील अनेक तरूणांना काम मिळाले आहे. टेंभुर्णी उपबाजाराच्या जवळ पिंपळनेर, तांबवे, शिराळा, आहेरगाव, आकुंबे, सापटणे (ढ), पालवण, येणेगांव, उजनी, रांझणी, कंदर, बेंबळे, शेवरे, चांदज, भूईंजे ही छोटी छोटी गावे आहेत.

माढा उपबाजार समितीची स्थापना २ ऑगस्ट १९५४ मध्ये करण्यात आली. माढा उपबाजार समितीच्या ताब्यात २ हेक्टर ६६ आर एवढे क्षेत्र आहे. माढा उपबाजार समितीचे आवार माढा-सोलापूर राज्य रस्त्यावरती असून वहातुकीच्या दृष्टीने अतिशय चांगले आहे. माढ्याच्या आडत बाजारामध्ये ज्वारी, बाजरी, मका, गहू, मूग, तूर, हरभरा, कापूस, मिरची, खपली जोड, करडई, सूर्यफूल, भुईमूग, शेंगा, कांदा यांची मोठ्या प्रमाणात आवक होते. या बाजारपेठेत वैराग, बार्शी, मोहोळ, सोलापूर, उस्मानाबाद, मोडनिंब येथील व्यापारी माल खरेदीसाठी येतात. माढा उपबाजाराच्या शेजारी उपळाई बु., अंजनगाव, उपळाई खुर्द, वाकाव, उंदरगाव, केवड, वडाचीवाडी, रणदिवेवाडी, वडशिंगे, म्हैसगांव, रिधोरे, पापनस, तांदूळवाडी, निमगांव, महातपूर अशा प्रकारची गावे येत आहेत. त्यामुळे मालाची आवकदेखील चांगली होते. मोडनिंब बाजारात संकरित गाई, बैल, खिलार गाय, वळू, शेळ्या-मेंढ्या कोंबड्या अशा प्रकारची जनावरे विक्रीसाठी येतात. त्याचबरोबर भाजीपाल्याचा बाजार दर शनिवारी भरतो. भाजीपाल्याची आवकदेखील अतिशय चांगल्या प्रकारची होते. त्याचबरोबर या आठवडा बाजारामध्ये भूसार मालाचीदेखील आवक मोठ्या प्रमाणात होते. यामुळे खेड्या पाड्यातील लोकांची अतिशय चांगली व्यवस्था झालेली दिसून येते. लोकांना लागणाऱ्या वस्तू आणण्यासाठी खाजगी वहानाची अतिशय चांगली सोय आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने 'गाव तेथे एस. टी.' अशी योजना आखल्याने वाड्या वस्त्यावरील लोकांची सोय झाल्यामुळे कमी त्रासात बाजार होतो.

### आठवडा बाजार :

माढा तालुक्यात अनेक गावात आठवडा बाजार भरतात. त्यामध्ये कुर्डूवाडी येथे गुरुवारी, मोडनिंब येथे शनिवारी, माढा येथे मंगळवारी, मानेगांव येथे शुक्रवारी असे भाजिपाल्याचे आठवडा बाजार भरतात. कुर्डूवाडीच्या बाजाराचे उत्पन्न नगर परिषदेला मिळते. तर ज्या ज्या गावात आठवडा बाजार भरतात त्यांचे उत्पन्न त्या त्या ग्रामपंचायतीला मिळते.

कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वेगवेगळ्या उपक्रमामुळे शेतकरी आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या पध्दतीने शेती करू लागल्याने जादा उत्पादन देणाऱ्या बी-बियाणाबरोबरच खते, औषधे तननाशके कधी आणि कशी द्यावीत हे ज्ञान आत्मसात केल्यामुळे उत्पादन वाढले. त्याचबरोबर बाजार भावाचे, वहातुकीचे, माल साठवणुकिचे ज्ञान मिळाले. बाजार समितीच्या गोडाऊनमुळे शेतकऱ्यांचा शेतमाल टिकून राहिल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कमी होऊन त्यांच्या जिवनामध्ये आर्थिक क्रांती घडवून आणण्याचे काम माढा व मोहोळ तालुक्यात कृषि उत्पन्न बाजार समितीने केल्याचे दिसून येते.

कृषीउत्पन्न बाजार समितीच्या कार्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आर्थिक बाबतीत बदल घडून आले. शेतकऱ्यांनी आधुनिक पध्दतीने शेती करून जास्त उत्पादन घ्यावे यासंदर्भात बाजार समितीने मार्गदर्शन केल्यामुळे उत्पादन वाढीबरोबरच त्या उत्पादित मालाचा दर्जा उंचावला. बाजार समितीच्या गोडावूनमुळे शेतकऱ्यांना कांही कालावधीसाठी आपला माल साठवून ठेवण्याची व्यवस्था झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यास मदत झाली. बाजार समितीच्या मार्गदर्शन शिबीरामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना नविन तंत्रज्ञान मिळाले. त्यामुळे माढा-मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारल्यामुळे तालुक्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागल्याचे दिसून येते.

## माढा समितीचे व्यवस्थापनः

कृषि उत्पन्न बाजार समितीचा कारभार हा महाराष्ट्र शासनाच्या सहकार कायद्याप्रमाणे लोकशाही पध्दतीने चालतो. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या दर पाच वर्षांनी निवडणुका होतात. निवडूण आलेल्या सदस्यामधून सभापती, उपसभापती यांची निवड केली जाते. त्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. हे सभापती व उपसभापती हे संचालक मंडळ आणि व्यवस्थापकांना विश्वासात घेवून बाजार समितीचे काम पाहतात. या सर्वांच्या सहकार्यातून शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला जातो.

## ➢ धान्य स्वच्छ करण्याची पध्दती :

शेतकऱ्यांकडून विक्रीसाठी आलेला माल बऱ्याचवेळ अस्वच्छ असतो. त्यामुळे त्या मालाला स्वच्छ करून घ्यावे लागते. ज्वारी, बाजारी, गहू, मका, सूर्यफुल, भुईमूग, तूर, मटकी, हुलगा, करडई, साळी (भात), हरभरा, सोयाबीण, चवळी, आळसुंदा, हा भुसार माल वेगवेगळ्या चाळण्यांच्यामधून हमालांच्या, मजूरांच्या, स्त्री-कामगारांकडून स्वच्छ करावा लागतो. तो स्वच्छ झाल्यानंतर तो माल उच्च प्रतिचा, मध्यमप्रतिचा, कनिष्टप्रतिचा ठरवून त्याची प्रतवारी ठरवून पोत्यात भरून विक्रीसाठी ठेवावा लागतो असे केल्याने चांगल्या मालाला चांगली किंमत मिळते.

बाजार समितीला कांही वेळेस फेडरेशनमार्फत कांदा सरकारी भाव ठरवून दिल्यानंतर खरेदी करावा लागतो. अशावेळी कांद्याची देखील प्रतवारी ठरवून तो दर एक दोन दिवसाला निवडावा लागतो. नाही तर या कांद्याला पाती फुटून तो नासण्याची शक्यता असते. विक्री झाल्यानंतर सुद्धा व्यापाऱ्यांना कांदा स्वच्छ करूनच भरून द्यावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो. धान्य स्वच्छ करण्यासाठी लागणारा मजूर उपलब्ध असल्याने आणि मजूरीचे दर अगदी नगण्य असल्याने शेतकऱ्यांनाही ते परवडतात. त्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समितीकडे माल पाठवून शेतकरी निश्चिंत राहून आपली झालेली पट्टी आणण्यासाठीच जातात. तोपर्यंतची सर्व जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समिती पालकत्व या नात्याने स्विकारते. कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांकडून आलेल्या एकूण माल, स्वच्छ केल्यानंतर त्याचे भरलेले वजन, व्यापाऱ्यांनी खरेदीची दिलेली किंमत, त्या मालाची एकूण बिले, त्यामधून आडतीच्या सर्व वेगवेगळ्या कपात, शेतकऱ्यांना दिलेल्या उचल याची इतंभूत नोंद केलेली असते. त्यामुळे शेतकरी परस्पर आपला माल पाठवून देऊ शकतो. संगणकामुळे कामकाज पारदर्शीपणे पार पाडले जाते. त्यामुळे व्यापाऱ्यांनाही आणि शेतकऱ्यांना त्याचा फायदा झला आहे.

## ➢ शेतकरी निवास व्यवस्था :

माढा तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती, कुर्डूवाडी यांनी कुर्डूवाडी, मोडनिंब, टेंभुर्णी या ठिकाणी शेतकरी निवास स्थाने बांधली असून ती सर्व सुविधांनी परिपूर्ण आहेत. सर्व सोई असून सुद्धा कांहीवेळा मोफत किंवा नगण्य अशी फी आकारून शेतकऱ्यांना राहण्यासाठी व्यवस्था केली आहे. सुरुवातीच्या कालावधीमध्ये वहातुकीचे साधने अपूरी असल्याने मुक्काम करावा लागत असे अशावेळी या सुविधांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतल्याचे आणि घेत असल्याचे दिसून येते आहे. मोहोळ कृषि उत्पन्न बाजार समितीनेदेखील शेतकरी निवासाचे सुसज्ज बांधकाम केले आहे. शेतकरी रात्री अपरात्री जरी पुणे, मुंबई, हैद्राबाद वरून आला तर राहण्याची सोय केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होताना दिसून येतो.

## ➢ बाजार भावाची प्रसारण व्यवस्था :

माढा तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीने संगणक व्यवस्था केल्याने जागतिक पेठेतील बाजारभाव, देशपातळीवरील बाजारभाव, राज्य पातळीवरती असलेला बाजार भावाची माहिती नेटवरून पहाता येते. तसेच वृत्तपत्रामधून तर कधी कधी वृत्तपत्रामध्ये जाहिरात टाकून चढ-उताराची माहिती प्रसारित केली जाते. तसेच 'अर्थविश्व' स्थानिक साप्ताहिकातून माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल बाजारपेठेत पाठवण्यासंदर्भात अचूक माहितीचा फायदा होतो.

## ➢ बाजार समितीला मिळणारे उत्पन्न :

कृषि उत्पन्न बाजार समितीला मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये प्रामुख्याने आडत व्यापाऱ्यांना दिलेला जागेपासून विक्री ८०० रू. शेतसारा (बिनशेती), लायसन २०० रू. वार्षिक भाडे १५०० रूपये शिवाय व्यापारी शेस शेकडा ५० पैसे व देखरेख फी शेकडा ५ पैसे अशी आकारली जाते. शिवाय ७५ गाळ्याचे लायसन फी २०० रूपये वार्षिक भाडे ६०० रूपये प्रमाणे बाजार समितीला उत्पन्न मिळते.[१२]

### ➢ आडत व्यापारी :

कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात चाळत असलेला आडत व्यापार शेतकरी लिलाव पध्दतीने चालतो. मुनीम शेतीमालाचा लिलाव पुकारतो ज्यांना माल घ्यायचा तो व्यापारी चढ्याभावाची बोली पुकारतो. जो व्यापारी जास्त बोली बोलतो त्यास तो माल विकत जातो. शेतकऱ्यांचा माल व्यापाऱ्यांने घेतल्यानंतर त्या मालाची जी एकूण रक्कम होईल त्यामधून आडत शेकडा ३ % प्रमाणे आकारली जाते. हमाली १०० क्विंटलच्या एक पोत्याला २.०० रू., तोलाई पोत्याला ७५ पैसे, लेव्ही पोत्याला २५ पैसे आकारली जाते. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या विकलेल्या मालातून ही रक्कम आडत व्यापारी वसूल करतात. आडतीवरती माल आल्याबरोबर स्वच्छ करून वजन करून ठेवले जाते. मालाचे सादे (लिलाव) झ ााल्याबरोबर शेतकऱ्यांना रोख स्वरूपात रक्कम दिली जाते.

### मार्केट कमिटीमुळे शेतकऱ्यांचा झालेला फायदा व आर्थिक विकास :

कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडी-माढा मुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचा माल विक्रीसाठी हक्काची बाजारपेठ मिळाली. भाजीपाला, फळे, भुसार माला व इतर सर्वप्रकारच्या विक्री पध्दतीमधील सकारात्मक बाबीमुळे वजन माप, विक्री मोबदला, व्यापारी शेतकऱ्यांमधील समन्वयामुळे दलालापासून सुटका झाली. शेतकऱ्यांना उत्पादनाबरोबरच मालाच्या प्रतवारी विषयी मार्गदर्शन, माल साठवणुकीसाठी गोडावून उपलब्ध करुन दिल्याने माल खराब होण्यापासून वाचला. अगाऊ रक्कम मिळाल्याने सावकारी कर्जापासुन सुटका होण्यास मदत झाली. शेती भावाचे प्रसारण केल्यामुळे घरबसल्या शेतकऱ्यांना बाजार भाव समजू लागले. त्यामुळे वेळीच बाजारात माल पाठविणे शेतकऱ्यांना शक्य झाले. माल वाहतुकीसाठी शेतकऱ्यांना मदत झाल्याने मालाची नासाडी थांबली. या दोन्ही बाजार समितीच्या कार्यामुळे शेतकऱ्यांचा फार मोठा फायदा झाला. त्यामुळे तालुक्याच्या विकासालाही बाजार समित्यांचा हातभार लागल्याचे दिसून येते.

### संदर्भ :

**१)** वार्षिक अहवाल, कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डूवाडी, १९७०-७१, पृ. ५.
**२)** मुलाखत, कदम रघुनाथ, सचिव, मार्केट कमिटी, कुर्डूवाडी, ३ जुलै २०१३.
**३)** कृषि दर्शनी २०१०, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, पृ. ९३, ११२.
**४)** कित्ता, पृ. ११३-१२९.